**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : काळुराम तुकाराम रोडे,
वय : ५० वर्षे,
व्यवसाय : शेती,
राहणार : धामणी, ता. आंबेगाव, जि. पुणे

**<u>सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके</u>**

१. पारगाव पोलीसांनी मला कधी, किती तारखेला व कशासाठी बोलविले होते हे मला सांगता येणार नाही. मी मित्राबरोबर पोलीस स्टेशनला गेलो होतो तेव्हा मला साहेबांनी सही करण्यास सांगितली.

२. आता मला दि.०७/०३/२०२४ रोजीचा जप्ती वजा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अनुक्रमांक २ वर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला सांगता येणार नाही. सदर सहीपुर्ता **निशाणी क्र. १६** देण्यात येते.

**(साक्षीदार अभियोग पक्षास समर्थन देत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे सरकारी वकीलांना उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. )**

३. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनास्थळ हे लोणी गावच्या हद्दीत, मैत्री बारच्या समोर, सोनवणे चायनीजच्या मागे पत्र्याच्या शेडमध्ये होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला म्हणुन मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी पंचनामा वाचुन पाहिला, त्यातील मजकुर मला खरा व बरोबर वाटला म्हणुन मी त्यावर सही केली. पोलीसांनी सही करण्यास सांगितले म्हणुन मी त्यावर सही केली. मी आरोपी परेश प्रकाश शहा यांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यावेळी

उपस्थित होतो केवळ आरोपीला वाचविण्यासाठी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास : आरोपीतर्फे वकील श्री. एन. आर. निघोट यांच्या मार्फत शपथेवर सुरु**

४. **नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि. ०४/१०/२०२५**
**घोडेगाव**